
लोभी व्यापारी

युगोस्लाव्हियन लोककथा



पुनर्कथन : आयरिन मिर्कोविच

चित्र : हॅरॉल्ड बर्सन

मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक

इव्हो नावाचा एक गरीब शेतकरी आपल्या घोड्याची खोगीर दुरुस्त करण्यासाठी शहरात येतो. तिथे तो घसरून दगडावर पडतो. आणि नेमका तिथे पडलेला एक बटवा त्याच्या नजरेला पडतो. त्याचवेळी त्याच्या कानावर दवंडी ऐकू येते की रफीक नावाच्या दुकानदाराचा बटवा हरवला आहे, जर तो कुणी त्याला परत आणून दिला तर त्याला एक सोन्याचे नाणे बक्षिस देण्यात येईल. हे ऐकून इव्हो ताबडतोब तो बटवा घेऊन रफीककडे येतो. बटवा पाहून रफीकला फार आनंद होतो पण लगेच त्याच्या मनात हाव निर्माण होते. त्यातले एक नाणे तो हळूच काढून ठेवतो आणि इव्होवर आरोप करतो की त्याने त्यातील एक नाणे आधीच काढून घेतले आहे.

“असे कसे शक्य आहे?” इव्होला त्याच्या प्रामाणिकपणावर शंका घेतल्यामुळे धक्काच बसतो. रफीक काही केल्या त्याचे ऐकायला तयार नसतो आणि त्याला कोर्टात घेऊन जातो.


कोर्टात काय घडतं हे वाचताना प्रत्येक वाचकाला मजा येईल अशी ही गोड युगोस्लाव्हियन लोककथा!

लोभी दुकानदार

युगोस्लाव्हियन लोककथा

पुनर्कथन : आयरिन मिर्कोविच चित्र : हॅरॉल्ड बर्सन

मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक





रफीक खूप श्रीमंत व्यापारी होता. तो अंगात उंची फरचा झगा आणि बोटांमध्ये चमचमत्या पाचू आणि माणिकजडित सोन्याच्या अंगठ्या घालायचा.




एके दिवशी रफीक त्याच्या दुकानात विकण्यासाठी तांब्याच्या भांड्यांची खरेदी करायला आला होता. तासनतास घासाघीस आणि कटकट केल्यावर अतिशय कमी किंमतीला एकदाची ती भांडी त्याने मिळवली.




दुकानात परत आल्यावर त्याच्या लक्षात आलं की आपला पैशांचा बटवा खिशातून गायब आहे. ताबडतोब आल्या पावली तो परत फिरला पण बटवा काही मिळाला नाही. रागाने त्याने स्वत:च्या डोक्याचे केस उपटले, मिश्या ओढल्या. त्याला खात्री होती की नक्की एखाद्या भामट्याने ती थैली लंपास केली असणार.



थोड्या वेळाने दुपारनंतर प्रत्येक छोट्या गल्लीत दवंडी पिटली जाते, “ऐका हो ऐकाSSSSS व्यापारी रफीकचे पैशाचे पाकीट हरवले आहे. ज्याला ते सापडले असेल त्याने ते परत आणून दिले तर त्याला बक्षिस म्हणून सोन्याचे एक नाणे भेट देण्यात येईल. ऐका हो ऐकाSSSS”







झालं असं की जेव्हा रफीक बाजारात घासाघीस करत होता त्याच वेळी इव्हो नावाचा एक गरीब माणूस बाजूच्या खेड्यातून त्याच्या घोड्याचे खोगीर दुरुस्त करायला आला होता. बायकोसाठी बाजारातून बांगड्या खरेदी करायची त्याची खूप इच्छा होती पण तेवढे पैसे त्याच्याकडे नव्हते.

सजलेल्या दुकानांकडे विस्फारून बघत इव्हो चालत होता तेवढ्यात दगडाला ठेच लागून तो खाली पडला.






जिथे तो ठेचकाळून पडला तिथे त्याला एक बटवा पडलेला दिसला. आणि नेमकं त्याच वेळी ती दवंडी त्याच्या कानावर पडली. अति प्रामाणिक असल्यामुळे बटवा घेऊन तो ताबडतोब रफीक व्यापाऱ्याच्या दुकानात आला.



“मी इव्हो. हा बहुदा तुमचा बटवा असावा.”

“खूप छान,” रफीक हर्षभरीत झाला. पण लगेचच त्याबदल्यात जाहीर केलेले बक्षिस आठवले आणि त्याला फार वाईट वाटले.





इव्हो दुकानातल्या वस्तू न्याहाळण्यात गुंग आहे हे पाहून त्या लोभी दुकानदाराने हळूच बटव्यातून एक नाणे बाहेर काढून लपवून ठेवले.





“अरे, हे काय?” रफीक म्हणाला. “बटवा हरवला तेव्हा त्यात दहा नाणी होती आणि आता त्यात नऊच कशी काय? ह्याचा अर्थ तू ह्यातून एक नाणं आधीच काढून घेतलंय.”

इव्होला ते ऐकून धक्काच बसला. बक्षिस मिळालं नाही ह्यापेक्षा आपल्या प्रामाणिकपणावर शंका घेतल्यामुळे त्याला खूप अपमानित वाटलं.


“असं शक्यच नाही! मी तर बटवा उघडूनही पाहिला नाही,” त्याने शपथ घेऊन सांगितलं.

“मला खोटारडा म्हणतोस काय? तुझ्यावर आता कोर्टात खटलाच दाखल करतो,” रफीक ओरडला.


इव्होची कोर्टात जाण्याची आजवर कधी वेळच आली नव्हती. न्यायाधीश जिथे बसतात ते आसन आणि ती आलिशान खोली पाहून तो भांबावून गेला. न्यायाधीशाना येताना पाहिल्यावर तो आणखीन भांबावला. अंगात घातलेल्या फरचा पायघोळ अंगरखा, डोक्यावरची पांढऱ्या केसांची टोपी, हातात जाडजूड पुस्तक आणि चेहऱ्यावरचे करारी भाव अशा न्यायाधीशांना पाहून त्याचे पाय लटपटू लागले.




रफीक उभा राहिला आणि बोलू लागला, “आदरणीय जज्जसाहेब. माझा बटवा हरवला तेव्हा त्यात दहा सोन्याची नाणी होती. हरवलेला माझा बटवा कुणाला मिळाला आणि मला परत आणून दिला तर त्याला एक नाणे बक्षिस देण्याचे मी जाहीर केले होते. ह्या शेतकऱ्याने परत आणून दिला तेव्हा मात्र त्यात नऊ नाणी निघाली. ह्याने आधीच बक्षिसाचे एक नाणे काढून घेतले आहे.”



न्यायाधीशांनी त्यावर इव्होला त्याचे काय म्हणणे आहे ते विचारले. इव्हो नम्रपणे म्हणाला, “जज्जसाहेब, मला जसा बटवा मिळाला तसाच्या तसा मी परत केला. मी तो उघडून पाहीला देखील नाही तर त्यातील नाणे मी कसे घेणार. मी एक प्रामाणिक माणूस आहे, साहेब.”



गंभीर आणि कडक भासणारे न्यायाधीश प्रेमळ मनाचे होते. ते अर्थातच तेथील सगळ्या लोकांमध्ये शहाणे होते. एक मिनिट त्यांनी शांतपणे विचार केला. आणि त्यांनी आपला निर्णय सुनावण्यासाठी घसा खाकरला.




“दुकानदार रफीक, तू म्हणालास की तुझ्या हरवलेल्या बटव्यात दहा नाणी होती. त्यामुळे नऊ नाणी असलेला बटवा तुझा असणं शक्य नाही. तू दुकानात परत जा आणि तुझा बटवा एखाद्या दिवशी कुणी तरी तुला परत आणून देईल त्याची वाट बघ.”






न्यायाधीशांनी मग इव्होकडे नजर टाकली. “हे बघ तुला नऊ नाणी असलेला बटवा मिळाला आहे. घरी जा आणि कुणी हा आपल्या मालकीचा असेल तर येईल मागायला. जर तो सहा महिन्यापर्यंत नाही आला तर ती नाणी तुझी. तुला तुझ्या इच्छेप्रमाणे त्याचा वापर करता येईल.”

तो निर्णय ऐकल्यावर लोभी रफीकचा संताप संताप झाला. पण काही बोलायची सोय नव्हती कारण बोललो तर अटक होण्याची भीती होती. लांब अंगरखा सांभाळत तो तावातावाने कोर्टामधून निघून गेला.





न्यायाधीशांनी इव्होला बटवा दिला. झाल्या प्रकाराने तो इतका चकित झाला की काय करावे ते त्याला सुचेना.

“प्रामाणिक माणूस हा सगळ्यात श्रीमंत असतो,” न्यायाधीश इव्होला म्हणाले,”तो पैशाने गरीब असला तरी.”

समाप्त